**विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांत रोहयोखाली सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम - अतिरिक्त लक्षांकाबाबत.................**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : रोहयो-२००९/प्र.क्र.१६/रोहयो-५,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ जानेवारी, २००९.

**वाचा :-**

१. शासन निर्णय क्रमांक : रोहयो-२००६/प्र.क्र.१३०/रोहयो-१०, दिनांक १५ डिसेंबर,२००६.
२. शासन निर्णय क्रमांक : रोहयो-२००६/प्र.क्र.१३०/रोहयो-१०, दिनांक २१ मे,२००७.
३. शासन निर्णय क्रमांक :रोहयो-२००७/प्र.क्र.२०४/रोहयो-५, दिनांक ६ फेब्रुवारी,२००८.
४. शासन निर्णय क्रमांक :रोहयो-२००७/प्र.क्र.१७९/रोहयो-१, दिनांक १० एप्रिल,२००८
५. शासन पत्र क्रमांक:रोहयो-२००६/प्र.क्र.१९४/रोहयो-५, दिनांक २८ एप्रिल,२००८.
६. शासन पत्र क्रमांक:रोहयो-२००६/प्र.क्र.१९४/रोहयो-५, दिनांक २६ नोव्हेंबर,२००८.

**प्रस्तावना :**

विदर्भातील ६ आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : रोहयो-२००६/ प्र.क्र.३०/रोहयो-१०, दिनांक १५ डिसेंबर, २००६ अन्वये विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांत रोहयोखाली, प्रत्येक तालुक्यात १००० याप्रमाणे एकूण ६४,००० सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. प्रत्येक तालुक्याला देण्यात आलेल्या या लक्षांकात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या बाबीचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांतील ६४ तालुक्यांना मिळून, प्रत्येक तालुक्यात ३०० प्रमाणे एकूण १९,२०० सिंचन विहिरींचा अतिरिक्त लक्षांक मंजूर करण्यात येत आहे.

• •

२. सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम अंतर्गत मंजूर करण्यात आलेला अतिरिक्त लक्षांकानुसार लाभार्थ्यांची निवड शासनाच्या दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ च्या पत्रातील निकषानुसार करण्यात यावी.

सदर निकष पुढीलप्रमाणे आहेत :-

१) ज्या शेतकरी कुटूंबात आत्महत्या म्हणून आपत्ती आली आहे व त्यांच्याकडे विहिरी नाहीत अशा सर्व अनुसूचित जाती/जमाती/सर्व साधारण(फेरफारानुसार)लाभार्थी (दीड एकर ते १६ एकर पर्यन्त जमीन.)

२) वरील "एक" प्रमाणे विहिरीसाठी लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर जेवढा विहिरींचा लक्षांक शिल्लक राहील त्यापैकी ५० टक्के विहिरी या दीड एकर ते ८ एकर पर्यन्तच्या शेतकऱ्यांना व उर्वरित ५० टक्के विहिरी या ८ एकरच्या वरील व १६ एकरांपर्यन्तच्या शेतकऱ्यांना देण्यात याव्यात. यामध्ये कमीत कमी ३० टक्के मागासवर्गीय लाभार्थी असणे आवश्यक राहील.

३. या अतिरिक्त सिंचन विहिरींचे तांत्रिक व आर्थिक मापदंड जवाहर विहिर योजनेप्रमाणेच असतील.

४. सदर शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या लक्षांकानुसार अर्ज मागविण्यापासून ते लाभार्थी निवडीची कार्यवाही दिनांक ३० जून, २००९ पर्यन्त पूर्ण करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( बा. बा. नारायणकर )
अवर सचिव,नियोजन विभाग.

प्रति,

राज्यपालांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री.
मा.उपमुख्यमंत्री.
सर्व मंत्री.
सर्व राज्यमंत्री.
मुख्य सचिव.
सर्व उपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.

सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (संबंधित जिल्हयांचे)
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद (संबंधित जिल्हयांचे)
जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी (संबंधित जिल्हयांचे)
उप विभागीय अधिकारी (महसूल) (सर्व संबंधित जिल्हयांचे)
तहसिलदार (संबंधित जिल्हयांचे)
गट विकास अधिकारी (सर्व संबंधित जिल्हयांचे)
सर्व मंत्रालयीन विभाग. निवडनस्ती.